# प्रमाणपत्र

**प्रा. डॉ. जी. पी. माळी**
एम. ए. पीएच. डी.
प्राचार्य, मराठी विभागप्रमुख
यशवंतराव चव्हाण कॉलेज
कोल्हापूर. ४१६००२

प्रमाणित करण्यात येते की, **श्री. साठे लक्ष्मण भानुदास** यांनी शिवाजी विद्यापीठाच्या **एम.फिल पदवीसाठी (मराठी) ''मंदा कदम यांच्या काव्यातून व्यक्त झालेली स्त्रीमनाची भाव स्पंदने''** या प्रबंधासाठी केलेले सर्व संशोधन माझ्या मार्गदर्शनाखाली झालेले आहे. हा प्रबंध स्वतंत्ररित्या लिहिला असून तो इतर कोणत्याही विद्यापीठातील कुठल्याही अन्य परिक्षेसाठी सादर केलेला नाही.

सदर प्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या एम.फिल पदवीसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

(प्राचार्य डॉ. जी. पी. माळी)

ठिकाण : कोल्हापूर

दिनांक : ३० जून २००६

# प्रतिज्ञा पत्र

**''मंदा कदम यांच्या काव्यातून व्यक्त झालेली स्त्रीमनाची भाव स्पंदने''** या विषयावरील सदरचा प्रबंध मी शिवाजी विद्यापीठाच्या **एम. फिल (मराठी)** पदवीसाठी लिहिलेला आहे. हा प्रबंध अथवा त्याचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही, कोणत्याही परिक्षेसाठी सादर केलेला नाही.

(श्री. साठे लक्ष्मण भानुदास)

ठिकाण : कोल्हापूर

दिनांक : ३० जून २००६

# ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापीठाच्या एम. फिल (मराठी) पदवीसाठी प्रबंध सादर करताना मला मनोमन खूप आनंद होत आहे. प्रथमत: एम. फिल पदवीसाठी विषयनिश्चती करताना माझ्या मनाची विलक्षण अशी अवस्था निर्माण झाली होती. गुरुवर्य माळी सरांशी चर्चा करताना त्यांच्याकडून अचानक व अनपेक्षितपणे ज्येष्ठ कवयित्री मंदा कदम यांचा विषय निघाला. कवयित्री मंदा कदम यांच्या कवितांचा अभ्यास करणे हे खरे तर माझ्या समोर आव्हानच होते पण त्यासाठी माझ्या मनाची तयारी आणि विचारांची दिशा निश्चित करण्याचे काम प्राचार्य डॉ. जी. पी. माळी सरांनी केले. प्राचार्य पदाचा भार सांभाळत असताना देखील वेळात वेळ काढून मी ज्या ज्या वेळी सरांच्याकडे जात असे त्या त्या वेळी सर हातातले काम बाजूला ठेवून माझ्याशी चर्चा करत, बारीक तपशील समजावून सांगत व काही महत्वाच्या सुचना करीत असत. त्या मला अभ्यासात उपयुक्त तर ठरल्याच पण मला पुढील आयुष्यात मोलाच्या ठरणाऱ्या आहेत.

डॉ. माळी सरांच्या मार्गदर्शनाखाली मी या प्रबंधिकेचे काम पूर्ण केले. त्यांच्या अमूल्य मार्गदर्शनाखाली मी आजन्म राहू इच्छितो.

शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागप्रमुख डॉ. कृष्णा किरवले, डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. विश्वनाथ शिंदे तसेच प्रा. हिमांशु स्मार्त, व प्रा. रणधीर शिंदे यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

कवयित्री मंदा कदम यांच्याशी वेळोवेळी झालेली चर्चा आणि प्राचार्य भैरव कुंभार यांनी केलेले मोलाचे मार्गदर्शन यामुळे मी हा प्रबंध पूर्ण करु शकलो. त्यांच्या मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

माझे बंधू प्रा. दुर्योधन साठे व प्रा. मार्तंड साठे यांनी वेळोवेळी विचारपूस करुन मला प्रबंध लिहिण्यास प्रेरणा दिली त्याबद्दल त्यांचाही मी अत्यंत आभारी आहे.

माझ्या आतापर्यंतच्या वाटचालीत महत्वाचा वाटा उचलला ते माझे आई, वडील, दादा, तात्या, वहिनी. त्यामुळे त्यांच्या ऋणात सतत राहणे मला आवडेल. एकूणच माझ्या

लेखनकार्याला सतत उत्तेजन, प्रोत्साहन दिले त्या सर्व ज्ञात-अज्ञात मित्रांची, सहकारी प्राध्यापकांची मी कृतज्ञता व्यक्त करतो व विशेष आभार मानतो.

या प्रबंधाच्या अभ्यासासाठी आवश्यक असणारे संदर्भ ग्रंथ यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेज कोल्हापूर, नाईट कॉलेज ऑफ आर्टस अँड कॉमर्स कॉलेज आणि बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय शिवाजी विद्यापीठ येथील ग्रंथपालांनी मला वेळोवेळी उपलब्ध करुन दिले त्याबद्दल त्यांचे आभार मानने हे मी माझे कर्तव्यच समजतो.

प्रबंधाचे टायपिंग शिवाजी शं. राणे, शिवाजी पेठ कोल्हापूर. यांनी वेळेत करुन दिले त्याबद्दल त्यांचाही आभारी आहे.

अभ्यासक

(लक्ष्मण भा. साठे)